# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## विद्यार्थी, कर्मचारी आणि नागरिकांशी ‘मेट्रो संवाद’  / स्मार्ट कार्ड, सवलती आणि प्रवाससुविधांबद्दल मार्गदर्शन




नागपूर : महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महामेट्रो) तर्फे आयोजित ‘मेट्रो संवाद’ उपक्रमांतर्गत गेल्या आठवड्यात शहरातील विविध संस्था व संघटनांमध्ये प्रेरणादायी तसेच माहितीपूर्ण संवाद सत्रांचे आयोजन करण्यात आले. या सत्रांमध्ये नागपूर मेट्रो अधिकाऱ्यांनी रामदेवबाबा अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांशी आणि शहरातील नागरिकांशी थेट संवाद साधला. नागपूर मेट्रोच्या अत्याधुनिक प्रवासव्यवस्था, स्मार्ट कार्ड म्हणजे महा कार्डचा वापर, उपलब्ध सवलती, तसेच प्रवाशांसाठी उपलब्ध सोयी-सुविधांबाबत सविस्तर मार्गदर्शन देण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सध्या चालू असलेल्या मोफत महा कार्ड च्या माहितीने झाली. विद्यार्थ्यांना स्मार्ट कार्ड अर्थात 'महा कार्ड' याची सविस्तर माहिती देताना, नियमित प्रवाशांना मिळणारी 10% सवलत आणि विद्यार्थ्यांसाठी 30% पर्यंत विशेष सूट या सुविधांचा लाभ दैनंदिन प्रवासात कसा होऊ शकतो, याचे मार्गदर्शन करण्यात आले.नागपूर मेट्रोच्या ग्रीन मेट्रो या वैशिष्ट्यपूर्ण संकल्पनेच्या परिचयाने श्रोते आनंदी झाले. मेट्रो अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, नागपूर मेट्रो ही देशातील अग्रगण्य सौरऊर्जेवर चालणारी मेट्रो प्रणाली आहे, जी ऊर्जा-बचत, प्रदूषणमुक्त प्रवास आणि पर्यावरणीय नियमांचे पालन याला प्राधान्य देते.

यासोबतच QR कोड आधारित टोकन प्रणाली, व्हॉट्सॲप तिकीट सेवा, मेट्रो मोबाईल ॲप, 'डे-पास' योजना आणि महामेट्रोच्या वेबसाईटवरील अद्ययावत वेळापत्रक व सवलतींची माहिती कशी पाहावी याचेही प्रात्यक्षिक देण्यात आले. मेट्रोच्या फीडर सेवा शेअर ऑटो, ई-बस आणि इतर सार्वजनिक वाहतूक सुविधा यांची माहिती देऊन प्रवास अधिक सोयीस्कर कसा बनवता येईल, हेही सांगण्यात आले.

आरबीआय मधील कर्मचाऱ्यांनी फीडर बस आणि लास्ट माईल कनेक्टिव्हिटी बद्दल सविस्तर माहिती घेतली. सत्रात थेट प्रश्नोत्तरे, किस्से आणि प्रत्यक्ष उदाहरणांमुळे वातावरण उत्साही झाले. रामदेवबाबा कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मेट्रोची सुरक्षा प्रणाली, सीसीटीव्ही नेटवर्क, महिलांसाठी राखीव डबे, दिव्यांगांसाठी विशेष सुविधा, तसेच प्रत्येक स्टेशनवरील प्रवासी सोयी चार्जिंग पॉइंट्स, स्वच्छतागृहे, लिफ्ट्स, एस्केलेटर्स आणि डिजिटल मार्गदर्शन याबाबत उत्सुकता व्यक्त केली. अधिकाऱ्यांनी सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे देत, प्रत्यक्ष वापराचे अनुभव शेअर केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना "ग्रीन नागपूरसाठी क्लीन ट्रॅव्हल" या अभियानात सामील होण्याचे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी मेट्रोचा नियमित वापर करून पर्यावरणपूरक प्रवास संस्कृतीला चालना देण्याचे आश्वासन दिले.

या संवाद उपक्रमाला रामदेवबाबा अभियांत्रिकी महाविद्यालय, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया तसेच इतर संस्थांतील विद्यार्थी, कर्मचारी व अधिकारी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी महा मेट्रो नागपूरचे श्री. महेश मोरोणे (जेजीएम - मल्टी मॉडेल इंटिग्रेशन) आणि श्री. अखिलेश हळवे (सिनियर डीजीएम - कॉर्पोरेट कम्युनिकेशन) उपस्थित होते.

महामेट्रोचा उद्देश नागरिकांमध्ये तांत्रिकदृष्ट्या प्रगत, पर्यावरणपूरक आणि सुरक्षित अशा नागपूर मेट्रोविषयी जागरूकता निर्माण करणे, तसेच अधिकाधिक लोकांना स्मार्ट प्रवासाच्या दिशेने प्रोत्साहित करणे हा आहे. 'मेट्रो संवाद' या उपक्रमातून प्रवाशांच्या शंका दूर करताना, मेट्रोविषयीचा विश्वास आणि स्वीकार वाढवण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे.